वाढवणच्या युवकांसाठी व्हीपीपीएलतर्फे व जीटीआयच्या सहकार्याने ‘कंटेनर टर्मिनल असोसिएट कोर्स’ अभ्यासक्रमाचा शुभारंभ

नवी मुंबई, 25 नोव्हेंबर 2026 : वाढवण बंदर कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत वाढवण परिसरातील युवकांना बंदर क्षेत्रातील रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) तर्फे आज ‘कंटेनर टर्मिनल असोसिएट’ या विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. व्हीपीपीएलच्या टर्मिनल भागीदारांपैकी एक असलेल्या गेटवे टर्मिनल्स इंडिया (जीटीआय) यांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे.

या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत युवकांना आरोग्य, सुरक्षा, पर्यावरण व संरक्षण (एच एस एस इ), बंदर संचालन आणि अभियांत्रिकी अशा विविध क्षेत्रांमध्ये कंटेनर टर्मिनल असोसिएट म्हणून काम करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण व ज्ञान दिले जाणार आहे. या उपक्रमातून स्थानिक युवकांची रोजगारक्षमता वाढविणे, त्यांना बंदर व लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करणे आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देणे हा उद्देश आहे.

याप्रसंगी बोलताना **व्हीपीपीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (सीएमडी) गौरव दयाल, भा. प्र. से.,** म्हणाले, *“जीटीआयच्या सहकार्याने वाढवण बंदर कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत सुरू करण्यात आलेला हा नवीन अभ्यासक्रम म्हणजे वाढवण बंदराच्या विकासप्रक्रियेत स्थानिक नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजांनुसार तसेच जागतिक स्तरावरील कौशल्य निकषांशी सुसंगत प्रशिक्षण मिळणार आहे.”*

ते पुढे म्हणाले, *“या परिसरातील स्थानिक समुदायांचे कौशल्यविकास, उज्ज्वल भविष्य आणि आकांक्षा यांमध्ये गुंतवणूक करून त्यांच्यासाठी दीर्घकालीन समृद्धी निर्माण करणे हा आमचा व्यापक उद्देश आहे. या प्रवासात मोलाचे सहकार्य करणाऱ्या जीटीआयचे आम्ही आभारी आहोत. वाढवण बंदराच्या विकासाचा लाभ परिसरातील प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.”*

दीड वर्षांच्या या अभ्यासक्रमात सुरुवातीचे सहा महिने प्रशिक्षण आणि त्यानंतर एक वर्षाची अप्रेंटिसशिप असे स्वरूप आहे. जीटीआयमधील उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांकडून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. सहा महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अप्रेंटिसशिप कायद्यानुसार विद्यार्थ्यांना विद्यावेतन दिले जाईल. तसेच, या अभ्यासक्रमाला एनएसडीसीअंतर्गत लॉजिस्टिक्स सेक्टर कौन्सिलचे प्रमाणपत्र मिळणार आहे.

भारताच्या महत्त्वपूर्ण सागरी प्रकल्पांपैकी एक म्हणून वाढवण बंदर आकार घेत असताना, स्थानिक समुदायासाठी विकासाच्या नव्या संधी निर्माण करण्यावर व्हीपीपीएलचा भर आहे. कौशल्य विकास आणि शिक्षण क्षेत्रातील सातत्यपूर्ण गुंतवणुकीच्या माध्यमातून बंदराच्या विकासाचा लाभ स्थानिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न व्हीपीपीएलतर्फे सुरू आहेत.

*****

व्हीपीपीएल संदर्भात माहिती:

वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (VPPL) हे देशाचे १३वे मोठे बंदर असून, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (JNPA) आणि महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड (MMB) यांच्या संयुक्त भागीदारीत स्थापन करण्यात आलेले एक विशेष उददिष्ट असलेले कंपनी रूपातील उपक्रम आहे. पालघर जिल्ह्यातील डहाणूजवळ वसलेले हे बंदर जागतिक स्तरावर आघाडीच्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवण्यास सक्षम आहे.३० ऑगस्ट २०२४ रोजी भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या बंदराच्या भूमिपूजनाचा ऐतिहासिक क्षण घडला.

निसर्गपूरकतेला प्राधान्य देत, वाढवण बंदर हे शंभर टक्के हरित तत्त्वावर आधारित असणार आहे, जे पर्यावरणावर कमीत कमी परिणाम करत अधिक कार्यक्षमतेने काम करेल.२४ दशलक्ष टीईयू (TEU) माल हाताळण्याची क्षमता असलेले हे बंदर देशाच्या व्यापार कार्यक्षमतेला गती देणार आहे. या माध्यमातून आर्थिक प्रगतीला चालना मिळेल आणि परिसराचा सर्वांगीण विकास होईल. वाढवण पोर्ट कौशल्य कार्यक्रमांसारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक समुदाय सशक्त करण्यावर वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड विशेष भर देत आहे.

अधिक जाणून घेण्यासाठी आमच्या संकेतस्थळावर आणि सोशल मीडियाला भेट द्या:

व्हीपीपीएल संकेतस्थळ - https://vadhvanport.in/ | फेसबुक - Vadhvan Port Project Ltd

X- VadhvanPort | इंस्टाग्राम - vadhvanport | लिंक्डइन - Vadhvan Port Project Ltd

माध्यम प्रतिनिधींनी अधिक माहितीसाठी संपर्क साधावा:

अंबिका सिंग,

वरिष्ठ व्यवस्थापक (मार्केटिंग), जेएनपीए

मोबाईल क्र. : +919920372677

ईमेल: ambikasingh@inport.gov.in